# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University



सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉


जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date :

### परिपत्रक क्र. 53/२०२१

प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य/प्राचार्या यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, दिनांक २५/०३/२०२१ रोजी झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील एम.ई. सत्र - IV चा शोधनिबंध संदर्भातील ठरावाच्या अनुषंगाने एम.ई. कार्यासनाकडून जा.क्र.पुअहोसोविसो/पवमूवि/एम.ई/३९२/२०२१, दिनांक ०६/०४/२०२१, परिपत्रक क्र. २७ अन्वये विद्यापीठाशी संलग्नित सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांना, ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये एम.ई. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे आणि सदरील अभ्यासक्रमातील सत्र I, II व III ची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून एम.ई. सत्र - IV चा शोधनिबंध विहित शुल्कासह विद्यापीठाकडे सादर करण्यास १ वर्षाची मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एम.ई अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात येत असलेने अशा विद्यार्थ्यांना सत्र - IV चा शोधनिबंध सादर करता येणार नाही, असे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तसेच अभ्यासक्रमाशी निगडीत सर्व घटकांच्या निदर्शनास आणून द्यावे, असे कळविण्यात आलेले होते.

त्यास अनुसरुन विद्यापीठाचे Academic Calendar विचारात घेवून शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये एम.ई. अभ्यासक्रमास प्रवेशीत जे विद्यार्थी सत्र I, II व III उत्तीर्ण आहेत, अशा विद्यार्थ्यांना सत्र - IV चा शोधनिबंध विहित शुल्कासह विद्यापीठाकडे सादर करण्याच्या दिनांक ३१/०७/२०२१ पर्यंतच्या (According to Academic Calendar) मुदतवाढीस मा.कुलगुरु महोदयांची मान्यता घेऊन परिपत्रकाद्वारे सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांना, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन, ई-मेलद्वारे व परिपत्रकाची प्रत स्पीडपोस्टाद्वारे पाठवून कळविण्यात आलेले आहे. तरीदेखील सद्यस्थितीत, शैक्षणिक वर्ष २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात एम.ई. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले व सत्र I ते III उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ मिळणेबाबतचे विनंती अर्ज महाविद्यालयांच्या प्राचार्यांमार्फत प्रस्तुत विभागास प्राप्त झाल्यानंतर सदरील बाब धोरणात्मक निर्णय असल्याने परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीसमोर फेरसादर करण्यात आला होता. सदर प्रकरणी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दिनांक ०५/१०/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

"विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील एम.ई. पदव्युत्तर पदवी (M.E.) या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये प्रवेशित जे विद्यार्थी सत्र I,II व III ची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना एम.ई. सत्र-IV चा शोधनिबंध महाविद्यालयामार्फत विद्यापीठाकडे सादर करण्यास शैक्षणिक वर्ष २०२१-२२ (३०/०४/२०२२) पर्यंत शेवटची व अंतिम मुदतवाढ प्रतिवर्ष रु.५०००/- प्रमाणे दंडाची रक्कम (प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक वर्षापासून पाच वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर जितक्या वर्षाचा विलंब झाला आहे.) आकारुन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली."

उक्त ठरावाच्या अनुषंगाने पदव्युत्तर पदवी एम.ई.या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये प्रवेशीत जे विद्यार्थी सत्र I, II व III ची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना एम.ई. सत्र - IV चा शोधनिबंध विद्यापीठाकडे सादर करण्यास दिनांक ३०/०४/२०२२ पर्यंत शेवटची व अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे प्रतिवर्षी रु.५०००/- प्रमाणे दंडाची रक्कम आकारावयाची आहे, त्यासंदर्भातील माहिती खालील तक्त्यात आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले शैक्षणिक वर्ष : २०१३-१४ (उदाहरणदाखल) | कालावधी | दंडाची रक्कम |
|---|---|---|---|
| १) | २०१३-१४ | पहिला वर्ष | निरंक |
| २) | २०१४-१५ | दुसरा वर्ष | निरंक |
| ३) | २०१५-१६ | तिसरा वर्ष | निरंक |
| ४) | २०१६-१७ | चौथा वर्ष | निरंक |
| ५) | २०१७-१८ | पाचवा वर्ष | निरंक |
| ६) | २०१८-१९ | सहावा वर्ष | रु.५,०००/- |
| ७) | २०१९-२० | सातवा वर्ष | रु.१०,०००/- |
| ८) | २०२०-२१ | आठवा वर्ष | रु.१५,०००/- |
| ९) | २०२१-२२ | नववा वर्ष | रु.२०,०००/- |

उपरोक्त प्रमाणे दंडाची रक्कम व विहित शुल्क रितसर महाविद्यालयामार्फत विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन विभागाच्या सूचनेनुसार वित्त व लेखा विभागात भरणा करण्याची प्रशासकीय कार्यवाही करावी. तसेच उक्त प्रकरणी आपल्या महाविद्यालयातील संबंधित विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन महाविद्यालयातील सूचनाफलकावर सदरची बाब प्रसिध्द करावी व पत्राद्वारे, ई-मेलद्वारे, SMS द्वारे व भ्रमणध्वनीद्वारे अवगत करावी. जेणेकरुन विद्यार्थी हित विचारात घेता एकही विद्यार्थी वंचित राहणार नाही, याची काळजी घ्यावी. तसेच ज्या-ज्या विद्यार्थ्यांना अवगत करण्यात आले आहे, त्यांची विद्यार्थीनिहाय माहिती विद्यापीठास सादर करावी.

आदेशावरुन /-

**( डॉ. शिवकुमार गणपूर )**
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**जा.क्र. पुअहोसोविसो/पवमूवि/एम.ई/२०२१/** 1328
**दिनांक :** 27 OCT 2021

प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या, सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.